स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ
नांदेड– ४३१६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY
NANDED-431606, MAHARASHTRA STATE, INDIA.
Established on 17th September 1994 - Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade
**Office of the Controller of Examinations**
**Phone: (02462) 229294**
**Fax : (02462) 229520**
**Website: www.srtmun.ac.in**
**E-mail: srtmuncoe@gmail.com**

जा.क्र.पनिका/परिपत्रक/उन्हाळी१७-परीक्षा/२०१६-१७/१७०० दिनांक : २१/०२/२०१७.

## परिपत्रक

प्रति,
**मा. प्राचार्य**
सर्व संलग्नीत महाविद्यालय
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय : **उन्हाळी २०१७ परीक्षेच्या नियोजना बाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, उन्हाळी २०१७ च्या पदवी अभ्यासक्रमाच्या परीक्षा हया दि. १५ मार्च २०१७ तर पदव्युत्तर व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या परीक्षा हया दि. ११ एप्रिल २०१७ पासुन सुरु होणार आहेत.

त्या अनुषंगाने या परीक्षेसाठी खालीलप्रमाणे कार्यपध्दती अवलंबीण्यात येणार आहे, त्यांची नोंद घेवुन सर्व महाविद्यालयातील प्राचार्यांनी त्याबाबतचे पुर्वनियोजन करुन परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी सहकार्य करावे.

१. सर्व महाविद्यालयातील परीक्षा हया त्यांच्याच महाविद्यालयात परीक्षा केंद्र म्हणुन घेण्यात येतील. प्रचलित पध्दतीप्रमाणे परीक्षा केंद्र दुस-या महाविद्यालयात देण्यात येणार नाही.
२. सर्व अभ्यासक्रमाच्या प्रश्नपत्रिका हया ऑनलाईन पाठविण्यात येणार आहेत. त्यासाठी खालील यंत्रणा आपल्या महाविद्यालयात तयार ठेवुन त्याची अद्ययावत माहिती Link Regarding Facilities to be made available by college for Summer-2017 Exam. या लिंकवर दि. ०७/०३/२०१७ पर्यंत पाठविण्यात यावी.
   १. गोपनिय परीक्षा कक्ष
   २. अद्ययावत Version चे Computer किंवा Laptop
   ३. संगणकाचे पुरेसे ज्ञान असलेला कर्मचारी.
   ४. अखंडीत इंटरनेट सुविधा किंवा नेट डोंगल (Tata Photan Plus, Airtel, Idea, Relience etc.)

**पान २ वर**

५. प्रिंटर, कॉपीयर, झेरॉक्स मशिन, फॅक्स मशिन, पी.डी.एफ Viewer, Web Cam, अखंडीत विद्युत पुरवठा, Generator Backup इ.

६. Power Backup for Internet Devices. (Router/Firewall etc.)

७. Permanent Email ID.

८. Static IP.

प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नीत असलेले सर्व कायम विनाअनुदानीत महाविद्यालयात कार्यरत असलेले विद्यापीठ मान्यताप्राप्त प्राचार्य व प्राध्यापक यांची अद्ययावत माहिती Link Regarding Facilities to be made available by college for Summer-2017 Exam. या लिंकवर दि. ०७/०३/२०१७ पर्यंत परीक्षा विभागास सादर करावी. त्याशिवाय त्यांच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्रे स्विकारले जाणार नाहीत. कारण प्राचार्य व शिक्षकांची उपलब्धता नसल्यास तेथे परीक्षा केंद्र देता येणार नाही.

मा. विद्या परिषदेच्या ठरावानुसार उन्हाळी २०१७ च्या परीक्षेच्या प्रथम व व्दितीय वर्षातील उत्तरपुस्तीकेच्या मुल्यांकनाची कार्यवाही त्या त्या महाविद्यालय स्तरावर करावयाची असल्यामुळे महाविद्यालयात नियमित प्राचार्य व शिक्षक असणे अत्यंत गरजेचे आहे.

एक वर्षीय अभ्यासक्रम जसे की, बी.एड्, बी.लिब,बी.जे, व पदविका अभ्यासक्रम तसेच तृतीय वर्षातील पदवी अभ्यासक्रमाच्या उत्तरपुस्तीका मुल्यांकन केंद्रीय मुल्यांकन केंद्र/ जिल्हा मुल्यांकन केंद्रावर होईल. महाविद्यालय स्तरावर मुल्यांकन / नियमनाची नियमावली / कार्यवाही यापुर्वीच आपणास कळविण्यात आलेले आहे.

करीता वरीलप्रमाणे माहिती त्वरीत पाठविण्यात यावी, जे महाविद्यालय वरील माहिती पाठविणार नाहीत अशा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्र स्विकारले जाणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयातील प्राचार्य व संबंधीत संस्थेवर राहील.

याची कृपया नोंद घ्यावी.

आपला,

**परीक्षा नियंत्रक**

**<u>माहितीस्तव प्रत सादर :</u>**

मा. कुलगुरु महोदय, प्रस्तुत विद्यापीठ.

मा. प्र-कुलगुरु महोदय, प्रस्तुत विद्यापीठ.